# महाराष्ट्र शासन

क्रमांक :- बैठक/नाजक-२०१४/प्र.क्र.९५/नाजकधा-३
नगर विकास विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० ऑगस्ट, २०१५.

दुरध्वनी क्र.०२२-२२०२९४५७
E-mail -- udd.ulc3@gmail.com

मेल द्वारे आज
दि. ३/१/१५ रोजी
प्राप्त.

स्थायी आदेश | शासन
निर्णय संचिकेत ठेवा

प्रति,

विभागीय आयुक्त, नागपूर.

अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, नागपूर नागरी समुह, जिल्हाधिकारी कार्यालय, जि.नागपूर.

3/12
CA

विषय :- नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ शी संबंधीत विविध बाबींच्या अनुषंगाने निर्णय घेणेबाबत आयोजीत मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ संबंधीत विविध बाबींच्या अनुषंगाने निर्णय घेणेबाबत दि.२९/७/२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांचे, समिती कक्ष, विधानभवन, मुंबई येथे दुपारे ०२:०० वाजता बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत नियमानुसार आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत पाठवण्यात येत आहे.

( समाधान खटकाळे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत,
मा.मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री वित्त यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री उद्योग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (नाजकधा-३).

D:\ULC-3_Gp\LETTER_2015_ULC-3.Doc

Scanned with CamScanner

# बैठकीचे इतिवृत्त

विषय:- नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ शी संबंधीत विविध बाबीच्या अनुषंगाने निर्णय घेणेबाबत आयोजीत मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

०२. नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ संबंधीत विविध बाबीच्या अनुषंगाने निर्णय घेणेबाबत दि.२९/७/२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांचे, समिती कक्ष, विधानभवन, मुंबई येथे दुपारी ०२:०० वाजता बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते:-

१) मा.मंत्री (उद्योग), मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (वित्त), मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई - विशेष निमंत्रीत.
४) मा.राज्यमंत्री (नगर विकास), मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. सदर बैठकीत नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ संबंधीत विविध विषयांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले:-

| अ. क्र. | मुद्दा | बैठकीत घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १. | नागपूर जिल्ह्यातील पारशिवणी तालुक्यातील कन्हांन, कांद्री, तिरोहा, खंडाळा, गहू व हिवरा या गावातील नाजकधा अंतर्गत संपादीत करण्यात आलेल्या जमिनीबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार नागपूर नागरी समुहात संपादीत करण्यात आलेल्या बहुतेक प्रकरणी जमिनीच्या संपादन प्रकियेत त्रुटी आढळून येत आहेत. सुधारित नागपुर सुधार योजनेनुसार पारशिवणी तालुक्यातील ज्या १५१ जमिनीधारकांच्या २०३.६३ . हेक्टर जमिनी कृषी विभागात समाविष्ठ झाल्या आहेत, त्या जमिनी नाजकधा कायदा अस्तित्वात असता तर नाजकधा अधिनियम, १९७६ मधील कलम ३४ नुसार पुर्नविलोकन होवून त्या जमिनी संपादनातून मुक्त झाल्या असत्या. तथापी, निरसन अधिनियमानुसार कलम ३४ अस्तित्वात नसल्याने अशी कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे याबाबतचा निर्णय मा.न्यायालयातच होऊ शकतो. नाजकधा अंतर्गत भूसंपादन करतांना राहीलेल्या त्रुटीबाबत मा.सर्वोच्च | नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ अंतर्गत भूसंपादन करताना राहिलेल्या त्रुटीबाबत मा.सर्वोच्च न्यायालयासमोर दाखल करावयाच्या पुर्नविलोकन याचिकेच्या निर्णयानंतर अशा प्रकारच्या संपूर्ण राज्यातील प्रकरणात अंतीम निर्णय घेण्यात यावा. तथापि, नाजकधा अंतर्गत राज्यातील विविध नागरी समुहात संपादित व सूट दिलेल्या जमिनीबाबत विभागाने ऑगस्ट अखेर स्वयंपूर्ण प्रस्ताव मंत्रीमंडळ समितीसमोर सादर करावा.<br>तसेच मे.व्होल्टास प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर दि.१२/५/२०१० च्या पत्रानुसार नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ निरसीत होण्यापूर्वी कलम १०(३) व १०(५) ची कार्यवाही होऊन जमीनी ताब्यात घेण्यात आल्या नसतील तर त्या जमीनी नाजकधा मुक्त करणेबाबत संबंधीत विभागीय आयुक्त / जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. परंतु, पारशिवणी तालुक्यातील काही जमीनी प्रकरणी दि.१२/५/२०१० च्या पत्रानुसार कार्यवाही |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | न्यायालयात काही प्रकरणी पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची भूमीका शासनाने घेवून त्यानुसार शासकीय अभियोक्ता, नवी दिल्ली यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या पुनर्विलोकन याचिकेच्या निर्णयानंतर प्रकरणी निर्णय घेणे योग्य ठरेल. | करण्यात आलेली नसेल तर अशी प्रकरणे पुन्हा तपासून त्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांना कळविण्यात यावे. |
| २. | नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम २३ अन्वये याचिकाकर्ता संस्थांना वाटप केलेल्या जमिनीबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय समितीने दि.१५/४/२०१५ च्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे लोहार समाज संघटना, नागपूर व खटीक समाज विकास संघटना, नागपूर यांना केलेले जमीन वाटप कायम करण्यात यावे. तसेच नागपूर महिला गृहनिर्माण सहाकरी संस्था, नागपूर व मागासवर्गीय बेघर महिला सहकारी गृहनिर्माण संस्था, नागपूर यांना वाटप केलेल्या जमिनीबाबत मा.न्या.बट्टा समितीने उपस्थित केलेल्या आक्षेपामध्ये तथ्य आढळून येत असल्याने सदर वाटप रद्द करण्यास मान्यता मिळावी. | मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय समितीने घेतलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ३. | नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम २३ अन्वये पशुक्रुरता निवारण समिती, पिपल्स फॉऊडेशन, नागपूर, अण्णाभाऊ साठे स्ट्रट, नागपूर यांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीबाबत जिल्हा तांत्रीक समिती, नागपूर यांनी शिफारस केल्यानुसार अटी व शर्तीचे पालन न केल्याने पिल्पस फॉऊडेशन, नागपूर या संस्थांचे जमिन वाटप रद्द करण्यात यावे व साहित्यभूषण अण्णाभाऊ साठे ट्रस्ट, नागपूर व पशुक्रुरता निवारण समिती यांना जमिन वाटप कायम करण्यास्तव संस्थेला जमिनीचे मुल्य भरण्यास मुदत देण्यास मान्यता मिळावी. | नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम २३ अन्वये पिपल्स फॉऊडेशन, नागपूर यांना वाटप झालेल्या संस्थेचे जमीन वाटप रद्द करण्यात यावे. तसेच साहित्यभूषण अण्णाभाऊ साठे ट्रस्ट, नागपूर व पशुक्रुरता निवारण समिती, नागपूर यांना वाटप केलेल्या जमिनीचे मुल्य भरण्यासाठी १ वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी. सदर कालावधीत जमिनीचे मुल्य न भरल्यास जमीन वाटप रद्द करण्यात यावे. |
| ४. | नाजकधा अधिनियम कलम २०/२१ अन्वये ज्या जमिनींना गृह बांधणी योजनेसाठी संपादनातून सुट दिलेली आहे. अशा प्रकरणी सूटीचे आदेश अस्तिवात / वैध असताना त्याच जमीनीचे सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडून नाजकधा अंतर्गत केलेली संपादनाची कार्यवाही अयोग्य | नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ नुसार, कलम २० अन्वये गृहबांधणी योजनेसाठी देण्यात आलेल्या सुटीच्या आदेशाला संरक्षण प्राप्त असल्याने, सुट देण्यात आलेल्या क्षेत्राचे संपादन रद्द करून त्या जमिनीच्या अधिकार अभिलेखातील महाराष्ट्र |



Scanned with CamScanner